**MHST0500 1002 2024**

**समरी दि.मु.क्र.२३/२०२४ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश**

**महादेव धोंडीराम कदम वि. राजेंद्र भिमराव कदम**

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. व्ही. पी. पाटील.**

**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. बी. बी. जाधव**

**निशाणी १३ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्याकरीता त्यांना ५ महिने १३ दिवसांचा विलंब झाला आहे. तो उशीर माफ होवून मिळण्याकरीता मर्यादा कायदा, १९६३ चे कलम ५ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील वादी विधीज्ञांचे हस्तलिखीत म्हणणे पाहिले. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, मूळ संक्षिप्त दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ मधील तरतूदींन्वये दाखल केलेला आहे. दावा दाखल झाल्यानंतर आदेश ३७ नियम २ (२) मधील तरतूदींनुसार परिशिष्ट ब मधील नमुना क्र.४ अन्वये प्रतिवादीस उपस्थितीपत्र दाखल करावे याकरीता समन्स अदा करण्यात आले. सदरचे समन्स प्रतिवादी यांना दि.१३/१२/२०२४ रोजी बेलीफ अहवाल नि.क्र.६ अन्वये बजावल्याचे दिसून येते. त्यानंतर प्रतिवादी हे १० दिवसांचे आत दि.२१/१२/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले, नि.क्र.९ व १० वर कैफियत दाखल करण्याकरीता अर्ज दिले. त्यानंतर वादी यांनी नि.क्र.१२ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे व त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी यांनी न्यायालयात उपस्थित पत्र दाखल केल्याच्या नंतर वादीने परिशिष्ट ब मधील नमुना क्र.४ मध्ये विहीत करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये प्रतिवादीस न्यायनिर्णयाचे समन्स बजवावे याकरीता अर्ज देणे आवश्यक होते परंतू तसा अर्ज न देता त्या अगोदरच वादी यांनी नि.क्र.१२ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतूदींन्वये न्यायनिर्णयाचे समन्स बजावलेचे नंतर आदेश ३७ नियम २ (३)

प्रतिवादीला बचावाच्या परवानगीचा अर्ज करता येतो. परंतू, वादी यांनी न्यायनिर्णयासाठी समन्स अदा करावे यासाठी अर्ज न दिल्याने व तशा प्रकारचे समन्स अद्यापपावेतो अदा केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज सद्य स्थितीत अपरिपक्व/अकाली दाखल केलेला आहे. त्यामुळे तो कायदेशीरदृष्ट्या सद्य स्थितीत चालू शकत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. निशाणी क्र. १३ चा विलंब माफीचा अर्ज तो अकाली दाखल केलेला असल्यामुळे नामंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना असा आदेश देण्यात येतो की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७(३)(२) अन्वये न्यायनिर्णयासाठी आवश्यक असणारे समन्स अदा करण्यासाठी आवश्यक ते पाऊल उचलावे.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.08.07 11:37:53 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः ०५/०८/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.